# राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद , महाराष्ट्र

# पुणे

## आयोजित

# राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा सन 2022-23

## नवोपक्रमाचे नाव -

## अभ्यंग पोषण

श्रीम. सुवर्णा सुभाष पाटील

अंगणवाडी पर्यवेक्षिका ,

ए.बा.वि.से.यो.प्रकल्प मोखाडा

पंचायत समिती मोखाडा

जिल्हा - पालघर



# नवोपक्रमाची गरज व महत्व

- जव्हार मोखाडा येथील प्रमुख समस्या कुपोषण असुन लहान वयात लग्न आणि कमी वयाची बालके जन्माला येणे ही आहे .या समस्येमुळे कुपोषणाचे चक्र तोडणे.
- एका बाजुला भारत देशाची विकसनशील देश म्हणुन ओळख आणि माझ्या पालघर जिल्हाची कुपोषित जिल्हा म्हाणुन ओळख ही विसंगती मनाला खंत वाटणे.
- बालकांची वजनवाढ करणे तसेच पोषणाबरोबर स्वच्छता व संगोपनाचे महत्व पटवुन देणे.
- चुकीच्या रुढी पंरपरा खोडुन शास्त्रीय पध्दती समजावणे.व मातांचा आत्मविश्वास वाढीस लावणे.
- स्वच्छता व काळजी घेण्यास मदत करुन आरोग्याच्या समस्या सोडवणे.
- माता सक्षमीकरणातुन 0 ते 6 वर्षाच्या बालकांच्या सर्वागिण विकासावर लक्ष केंद्रीत करणे.



नवोपक्रमाची उद्दिष्टे
कुपोषणाचे चक्र थांबवणे
आरोग्याच्या समस्या सोडवणे
शास्त्रोक्त माहिती करुन देणे.सकारात्मक दृष्टीकोन
कमी वजनाच्या बालकांची वजन वाढ करुन साधारण श्रेणीत आणणे
माता सक्षमीकरण- निर्णय क्षमता विकसित करणे
संगोपनाच्या चांगल्या संकल्पना रुजविणे

# नवोपक्रमाचे नियोजन व कार्यपद्धती

- माहे एप्रिल 2022 मध्ये अंगणवाडी सेविका सभा घेउन कार्यक्षेत्रातील समस्येबाबत सविस्तर
- चर्चा केली.
- अंगणवाडीतील लाभार्थ्यांचे गट निश्चीत केले.

| गरोदर माता | स्तनदा माता | 0 ते 2 वर्ष वयोगटातील बालके | कमी वजनाची बालके |
|---|---|---|---|
| १६४ | २११ | ४०० | ३१ |






# नियोजन व कार्यपध्दती

- प्रथम माझ्या विभागातील अंगणवाडी सेविकांचे पोषण व बालसंगोपनाचे प्रशिक्षण घेतले. **जीवन कौशल्य् प्रशिक्षणातुन लैंगिक आजार व कुंटुब नियोजन साधनाबाबत मार्गदर्शन केले.**

# नियोजन




गरोदर व स्तनदा मातांची सभा घेउन कमी वजनाच्या जन्मलेल्या बालकांची काळजी कशी घ्यावी हे समजाउन सांगितले.मालीश् करणे बालकाला उबदार ठेवणे किती गरजेचे आहे या बाबत शास्त्रोक्त माहिती  दिली. तसेच  कांगारु पध्दतीची अवलंब कसा करणे या बाबत समजाउन सांगीतले.लहान कुटुंबाचे महत्व पटवुन दिले.









# नियोजन









अंगणवाडी सेविका मार्फत अंगणवाडीत मातांना बालकांची मालीश कशी करावी याचे प्रात्याक्षिक करुन दाखविले आणि दर महिन्याला वजनवाढ दाखवली .

# नियोजन

- अंगणवाडीतुन सी बी ई कार्यक्रमातुन मातांना बाळासाठी खोबरेल तेलाची बाटली देण्यात आली.तसेच मुलांसाठी नेलकटर व साबण देण्यात आला.
- बालसंगोपन तसेच बालाहाराचे प्रात्याक्षिक ही करण्यात आले.
- तसेच कमी वजनाची बालके जन्माला येण्याची कारणे समजाउन सांगितले.लहान वयात माता झाल्यामुळे मातेच्या व बालकाच्या आरोग्याची हानी होते याबाबत उदाहरणे देउन स्प्ष्ट केले.उदा.लहान झाडाला जर फळ आले तर झाडाची वाढ खुंटते.व फळ ही निकृष्ठ दर्जाचे येते.
- या सर्व गोष्टी एकमेकांशी निगडीत आहेत आणि कुपोषणाची साखळी तयार होते.जर बाळाचे वजन वाढ होणे आणि योग्य् वयात लग्न् व माता होणे किती गरजेचे आहे.हे ही पटवुन सांगण्यात आले.














# नियोजन



- ❖ **दोन मुलां मध्यो अंतर ठेवले तरच आपण प्रत्येक बाळाकडे चांगले लक्ष देउ शकतो.यासाठी गर्भ निरोधक साधने कोणती आहेत व त्याचा वापर या बाबत सेविका मार्फत मार्गदर्शन करण्यात आले.**
- ❖ वजन वाढ झाल्यानंतर बालकांचा आणि मातांचा आर्दश माता म्हणुन सत्कार करण्यात आला.बक्षीस म्हणुन स्व्च्छता किट देण्यात आले.
- ❖ बाळासाठी बक्षीस म्हणुन नेलकटर,साबण,पाणी गाळण् असे किट देण्यात आले.
- ❖ अंगणवाडीत माताबैठकीत बालकांच्या वजन वाढीचे सामाजिक लेखा परिक्षण करण्यात आले. वजनाचा आलेख तक्ता आणि हिरव्या ,पिवळया व लाल रंगाचे महत्व् स्थानिक उदाहरण देउन स्प्ष्ट केले.





# उपक्रम घेतांना आलेल्या अडचणी

- मातांमध्ये अनेक गैरसमज असल्याने अंधश्रध्दा तसेच रुढी पंरपरेचा पगडा असल्याचे दिसुन आले.व सहजासहजी आपले विचार बदलवु शकत नाही असेही दिसुन आले.
- दोन मुलांमध्ये कमी अंतर असल्याने प्रत्येक बालकाकडे लक्ष दिले जात नसल्याचे दिसुन आले.
- मालीश करण्याची पध्दत माहित नसल्याचे जाणवले.

# नवोपक्रमाची यशस्वीता व फलनिष्पती

| गरोदर माता | स्तनदा माता | 0 ते 2 वर्षाची बालके | कमी वजनाची बालके |
| --- | --- | --- | --- |
| गरोदर मातांना बाल संगोपनाच्या पुर्वकल्पना मिळाल्या. | स्तनदा मातांना स्तनपाना बरोबर बालकाची जडणघडण करतांना आवश्यक ज्ञान मिळाले.मुलांमध्ये अंतर ठेवणेचे महत्व पटले. | मुलांची वजन वाढ झाली आणि श्रेणी वर्धन झाले. आरोगयाची समस्या कमी होतांना दिसु लागली | जन्मता कमी वजन असले तरी कांगारु पध्दतीने आणि मालीश केल्यामुळे वजन साधारण बालकांप्रमाणे झाले. |







# नवोपक्रमाची यशस्वीता व फलनिष्पती

मालीश केल्यामुळे बाळाला शांत झोप लागुन पचनक्रिया
सुधारते भुक वाढते.हाडाची लवचिकता आणि मजबुती वाढते.














IMG-20230214-WA0018.jpg

# नवोपक्रमाची यशस्वीता व फलनिष्पती





अंगणवाडी केंद्र- पिंपळपाडा बाळाचे नांव-रिया बुधर चालत नव्हती तसेच वजनवाढ होत नव्हती. मालीश करुन चालायला लागली.सध्या साधारण श्रेणीत आहे





अंगणवाडी केंद्र- सातुर्ली वडपाडा बाळाचे नांव-बाळा सोमनाथ मौळे दत्तक बाळ,जन्मत वजन कमी.2 किलो मातेने बालसंगेपनाच्या सवयी समजुन घेतल्या.वरचे दुध,स्वच्छता आणि मालीश पध्दतअवलंबवली वजनात इतर बालकाप्रमाणे वाढ होत आहे साधारण श्रेणीत आहे.सध्या 5.900

अंगणवाडी केंद्र- बकुळीपाडा बाळाचे नांव-तन्वेश व पन्वेश खुताडे जुळी बाळ,जन्मत वजन कमी. मातेने व आजीने बालसंगेपनाच्या सवयी समजुन घेतल्या.स्वच्छता व आहार वजनात इतर बालकाप्रमाणे वाढ होत आहे साधारण श्रेणीत आहे



# नवोपक्रमाची यशस्वीता व फलनिष्पती



अंगणवाडी केंद्र-सातुर्ली
बाळाचे नांव-सौरभ व स्वरा घारे
जुळी बाळ,जन्मत वजन कमी.2 किलो व 1 किलो मातेने कागांरुपध्दत समजुन घेतली.बेबी केअर किट दिले.मालीश पध्दत स्वच्छता व आहार वजनात इतर बालकाप्रमाणे वाढ होत आहे साधारण श्रेणीत आहे.सध्याचे वजन 10.500 व 10.100







अंगणवाडी केंद्र- साखरी
बाळाचे नांव-दिपीका गणेश बरफ
बाळ,जन्मत वजन कमी.2.200 किलो मातेने बालसंगोपनाच्या सवयी समजुन घेतल्या .स्वच्छता आणि मालीश पध्दत अवलंबवली वजनात इतर बालकाप्रमाणे वाढ होत आहे 5 महि न्यात 5 किलो साधारण श्रेणीत आहे


अंगणवाडी केंद्र-आंब्याचापाडा
बाळाचे नांव-एकांश व आंकांक्षा वझरे
जुळी बाळ,जन्मत वजन कमी.1.5 किलो व 1 .4 किलो मातेने कागांरुपध्दत समजुन घेतली.बेबी केअर किट दिले.मालीश पध्दत स्वच्छता व आहार वजनात इतर बालकाप्रमाणे वाढ होत आहे साधारण श्रेणीत आहे.सध्याचे वजन 11.500 व 10.500

अंगणवाडी केंद्र- धारेचापाडा
बाळाचे नांव-रितु दिपीक बाळ,जन्मत वजन कमी.2. किलो माता मृत्यु झाला. आजीने बालसंगोपनाच्या सवयी समजुन घेतल्या .स्वच्छता आणि मालीश पध्दत अवलंबवली वजनात इतर बालकाप्रमाणे वाढ होत आहे 7 किलो साधारण श्रेणीत आहे





# फलनिष्पती



१४००
१२००
१०००
८००
६००
४००
२००
०
२३५
७५१
९२२
१३२८
१९०
३२१
८१
१२२
मालीश पध्दत ज्ञान
स्वच्छतेच्या सवयी व महत्व
दोन मुलांमध्ये अंतर
बालकांची वजनवाढव श्रेणी बदल
उपक्रमापुर्वी
उपक्रमानंतर

# सन्मान व प्रशस्तीपत्रक





## मोखाडा-पर्यवेक्षिका सुवर्णा पाटील यांना गुणवंत कर्मचारी पुरस्कार जाहीर

मच्छिंद्र चव्हाण /वसई : मोखाडा - सन २०१९-२० वर्षात महाराष्ट्र राज्यातील ४३ अधिकारी व कर्मचारी यांना गुणवंत अधिकारी व कर्मचारी म्हणून गौरव करण्याची अंतिम निवड जाहीर करण्यात आली आहे.ग्राम विकास विभागातील क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी व कर्मचारी यांना गुणवंत कर्मचारी पुरस्कार योजने अंतर्गत पालघर जिल्ह्यातील मोखाडा तालुका येथे कार्यरत पर्यवेक्षिका सुवर्णा पाटील यांची निवड करण्यात आली आहे.एकात्मिक सेवा योजना प्रकल्प मोखाडा अंतर्गत मो-हांडा २ विभागाच्या अंगणवाडी पर्यवेक्षिका सुवर्णा सुभाष पाटील यांनी मोखाडा तालुक्यातील अंगणवाडी कार्य क्षेत्रात लोकोपयोगी अनेक उपक्रम राबविले.सेविकांना तसेच कुपोषणावर मात करण्यासाठी माता बैठकीतून जनजागृती केली. अंगणवाडी सेविकांना प्रशिक्षण देऊन सक्षम केले.कुपोषणाचे मुळ किशोर वयात दिसून येते त्या अनुषंगाने पाटील या किशोरवयीन मुलींना प्रशिक्षण शिबिराच्या माध्यमातून मार्गदर्शन करत केले. त्यासाठी त्यांनी त्यांच्या विभागात अंगणवाडी सेविकांना प्रशिक्षित करून एक टिम तयार केली आहे व ही टिम देखील किशोरवयीन मुलींना मार्गदर्शन करण्याचे काम करत आहे.मोखाडा तालुका हा दुर्गम आदिवासी तालुका असुन अज्ञान अशिक्षितपणा हा देखील कुपोषणाला काही प्रमाणात कारणीभूत आहे.म्हणून यासारख्या प्रशिक्षणाच्या माध्यमातून जनजागृती करण्याचा प्रयत्न एकात्मिक सेवा योजना प्रकल्पाच्या मो-हांडा २ विभागाच्या सुवर्णा पाटील करताना दिसुन येत आहे.यासारख्या प्रशिक्षणाच्या वेळी किशोरी व माता त्यांच्याजवळ आपले प्रश्न, समस्या त्यांच्याजवळ मांडतात.त्यातून मार्ग कसा काढायचा याचे मार्गदर्शन त्या करतात. एक आदर्श अंगणवाडी बनवण्याच्या अनुषंगाने त्या नेहमी प्रयत्नशील असतात.त्यांच्या कार्क्षेत्रातील अंगणवाडी त्या स्वच्छ व सुशोभित करून घेतात. मुलांना आवडेल व खेळता खेळता शिकता येईल असे वातावरण तयार करतात. विटभट्यांवर जाणीवपूर्वक भेट देतात.तेथील पालकांना, मातांना शिक्षणाचे महत्व पटवून देतात.मोखाडा तालुक्यातील त्यांचे काम हे खरच कौतुकास्पद आहे. तसेच दोन मुलामध्ये अंतर ठेऊन मुलाचे कुपोषण थांबवू शकतो. या दृष्टीने कुटुंब नियोजन आणि गर्भ निरोधक साधने याचा ही प्रचार प्रसार वैधनिक पद्धतीने सांगून मातांची निर्णय क्षमता वाढविण्याचे काम ही या प्रशिक्षणातुन केले जात आहे. मोठ्या कुटुंबामुळे होणारे आर्थिक शारीरिक सामाजिक हाल अपेष्टा मातांना मार्गदर्शन व उदाहरणं देऊन पटवून दिले जात आहे.. पुढच्या पिढीच्या दृष्टीने हे एक महत्वाचे पाऊल आहे.

**दै. चौफेर संघर्ष कार्यालय**
कार्यालय संपर्क : ०२५०/२३३०४०९
पहिला मजला, आनंद श्रद्धा १०१, शास्त्री नगर, अंबाडी रोड वसई, ता. वसई, जि. पालघर, ४०१२०२, महाराष्ट्र







**ऑनलाईन कार्यक्रम**


# अंगणवाडी ताईंचे मासिकातील लेख





अंगणवाडी सेविकांचे 'वेगळे' प्रयोग !

सुवर्णा पाटील



माझी अंगणवाडी

# वृत्तपत्राने घेतलेली दखल



पुण्य नगरी

## स्वस्थ बालक सजग पालक पोषण अभियानाचे आयोजन

। मोखाडा : मोखाडा येथील एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्पाच्या मोर्हांडा २ या विभागाच्या पर्यवेक्षिका सुवर्णा पाटील यांनी कुपोषण निर्मूलनासाठी पोषण अभियानांतर्गत प्रत्येक अंगणवाडी केंद्रात 'स्वस्थ बालक सजग पालक' हे अभियान राबवले जात आहे.

मोर्हांडा २ या बीट मधील कुपोषित बालकांना सदृढ बनवण्यासाठी प्रत्येक अंगणवाडी केंद्रात 'स्वस्थ बालक सजग पालक' या अभियानाच्या माध्यमातून कुपोषण निर्मूलनासाठी मातांनी बालकांना सकस आहार कसा द्यायचा? बालकांच्या आरोग्याची काळजी कशी घ्याल? या विषयावर सुवर्णा पाटील यांनी मार्गदर्शन केले. तसेच प्रत्येक अंगणवाडी केंद्रातील ६ महिने ते ३ वर्षे आणि ३ वर्षे ते ५ वर्षांच्या बालकांमधून सदृढ बालकांची निवड करून मातांचा सत्कारसुद्धा यावेळी करण्यात आला. त्याचप्रमाणे प्रत्येक बालकाच्या आईने आणि अंगणवाडी सेविकेने वजनवाढी साठी काय प्रयत्न केले पाहिजे, यावर चर्चा करण्यात आली.

या वेळी सुवर्णा पाटील यांनी वजन ग्रेडेशन पुस्तकातील रंगाचे महत्त्व पटवून दिले. तर आरोहन या सामाजिक संस्थेच्या मदतीने मुलांना स्वच्छता किट आणि चिक्कीचे सुद्धा वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या रूपाली देशमुख व आरोहन संस्थेच्या व्यवस्थापक तमन्ना यांच्या हस्ते मुलांना स्वच्छता किटचे वाटप करण्यात आले.



४ बुधवार दि. ०९ डिसेंबर २०२० जब तक दवाई नही, तब तक ढिलाई नही। वसई विकास

गरोदर व स्तनदा मातांना आरोग्याबाबत जागृत करणे गरजचे : पर्यवेक्षिका सुवर्णा पाटील

विरार ब्लॉक काँग्रेसतर्फे डॉ. बाबासाहेबांच्या स्मृतींना अभिवादन

डॉ. आंबेडकर यांनी श्रमिक, शेतकरी आणि महिलांच्या हक्क-अधिकारांचे समर्थन केले : विकासबंधु वर्तक

# संदभसुची व परिशिष्ठे

**आयुर्वेद शास्त्राप्रमाणे बालकांची हाडे बळकट होणेसाठी अभ्यंग स्नान आणि मालिश करणे हा सर्वोत्तम उपाय सांगितला आहे. तसेच शासनाकडुन बालकांना उबदार ठेवणेसाठी बेबी केअर किट देण्यात येत आहे.**









# समारोप

अगंणवाडी कार्यक्षेत्रात पयवेक्षिका ही भुमिका साकारतांना आपण केलेल्या कामाचे परिणाम दिर्घकालीन असतील असा आत्मविश्वास निर्माण झाला.व त्या समस्यां बददल असलेली अस्वस्थता कमी झाली. मातांमध्ये व माझ्यांमध्ये जवळीकता निर्माण होउन आपुलकीचे नाते तयार झाले.समस्या सोडवितांना कितीही अडचणी आल्या तरी यश मिळु लागले.माताच्या व मुलींच्या चहे-यावरचा आनंद पाहुन कामाचे समाधान वाटु लागले. मी 2009 रोजी अगंणवाडच्या कार्यात माझा सहभाग नोंदवला.सुरवातीला निरस वाटणारे काम आज माझ्यासाठी माझा अभिमान झाला आहे.हा प्रवास अगदी छोटया छोटया गोष्टीतुन शिकुन पुर्णत्वाकडे मला नेत आहे.यात माझा गुरु ही बालके व अगंणवाडी ताई, मदतनीस ताई झाल्या.असं म्हणतात की कामावर प्रेम करता करता काम ही आपल्यावर प्रेम करु लागते.त्याप्रमाणे अगंणवाडीतील गरोदर माता स्तनदा मातांचे प्रश्न मला आपले वाटु लागले.अगंणवाडी क्षेत्रातील सर्व महिला वर्ग किशोरी बैठका ,माता बठैकातुन आपल्या मनातील ईच्छा अपेक्षा व अडचणी सांगु लागल्या.अनेक प्रशिक्षणे घेउन कुपोषणाचा अभ्यास केला. या प्रशिक्षणाचा उपयोग करुन आदर्श अगंणवाडी तसेच आदर्श सेविका घडविण्यात मला प्रोत्साहनात्मक यश आले आहे. समाजाच्या सहभागातुनच सामाजिक विकास घडु शकतो.या साठी सर्वानी आपआपली जबाबदारी ओळखनु पुढे आले पाहिजे.





# धन्यवाद